## रयत शिक्षण संस्थेचे
## अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स व हुतात्मा बाबू गेणू सायन्स महाविद्यालय, मंचर

# कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना महाविद्यालयात कार्यरत आहे. आजच्या उच्चशिक्षण पद्धतीत विद्यार्थीदेखील उच्च कोटीचा बनावा, त्याला सामाजिक जाणीव असावी, त्याने राष्ट्रीय एकात्मतेचा ध्यास घ्यावा तसेच व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केवळ पुस्तकी वा बौद्धिक शिक्षणाने होऊ शकणार नाही. शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या सर्वांच्या संतुलनातून व्यक्तित्त्व विकसित होत असते. या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुनच विद्यापीठाने उच्चशिक्षण घेत असताना, विद्यार्थ्यांवर श्रम संस्कारांचाही वर्षाव व्हावा, त्यानी हा ठेवा चिरंतन जपावा, या उदात्त हेतूने कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना सुरु केलेली आहे.

### योजनेची उद्दिष्टे :

1) आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू आणि होतकरु विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण संपादन करण्यासाठी आर्थिक साहाय्य करणे.

2) मानवी श्रमाची प्रतिष्ठा जोपासणे.

3) ज्ञानसेवक (ज्ञान सेवक) बनवानी.

4) स्वयंरोजगाराबाबत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणे.

5) विद्यार्थ्यांमध्ये श्रमसंस्कृतीची (Work ulture) जाणीव निर्माण करणे.

### योजनेकरिता पात्रता :

या योजनेतर्गत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक रु. 8,00,000/- (रु. आठ लाख फक्त) पर्यंत/उत्पन्नाची मर्यादा प्रचलीत शासकीय नियमानुसार असेल.

### कामाचे तास :

'कमवा व शिका' योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांला प्रत्येक दिवशी जास्तीत जास्त तीन तास काम देता येईल. कमवा व शिका योजनेचा कामाचा दरः रु. 55/- प्रति तास (सन 2025-2026) असा आहे.

### आवश्यक कागदपत्र :

1) कमवा व शिका योजनेचा प्रवेश अर्ज

2) मागील वर्षाची गुणपत्रीका (झेरॉक्स कॉपी)

3) महाविद्यालयात प्रवेश घेतल्याची पावती (झेरॉक्स कॉपी)

4) उत्पन्नाचा दाखला (झेरॉक्स कॉपी)

5) विद्यार्थ्याचे बँक पासबुक (झेरॉक्स कॉपी)

6) जातीचा दाखला (झेरॉक्स कॉपी)

प्रा. डॉ. ए. के. वळवी, विद्यार्थी विकास अधिकारी (९९२१२८४५४८)

– प्राचार्य, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर